PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Pak Pak Pakaak
Year: 2005

Song: Dipaadi Dipang
Lyricist:

खारे वारे मतलई वारे
समोरच्या टाकीत पाणी किती
पलशीच्या दाजी कल्म पंचमी
जणू रे तुमची कशी युती
केशवसुत केशवकुमार
यातले नक्की अत्रे कोण
समजत नाय उमजत नाय
काय समजत नाय उमजत नाय
चिखलूचा मेंदू फुकायचा धूर
हे चिखलूचा मेंदू फुकायचा धूर
हे चिखलूचा मेंदू फुकायचा धूर
चिखलूचा मेंदू फुकायचा धूर
हे चिखलूचा मेंदू फुकायचा धूर
चिखलूचा मेंदू फुकायचा धूर
हे चिखलूचा मेंदू
सगुने खुप शिकायचं
खूप हुशार बनायचं

डिपाडी डिपांग ढिडपाडी डिपांग
डिपाडी डिपांग ढिडपाडी डिपांग
डिपाडी डिपांग ढिडपाडी डिपांग
डिपाडी डिपांग ढिडपाडी डिपांग
डिपाडी डिपांग ढिडपाडी डिपांग
अडाणीपणाच्या नानाची टांग
डिपाडी डिपांग ढिडपाडी डिपांग
अडाणीपणाच्या नानाची टांग
डरनेका नहीं शाळेत जायचं
बिनधास्त टाकून मोठी ढांग
बघायचं ऐकायचं समजून घ्यायाचं
धरून बसायचं पहिली रांग
डिपाडी डिपांग ढिडपाडी डिपांग
अडाणीपणाच्या नानाची टांग
अडाणीपणाच्या नानाची टांग

विटीदांडूतले अबक-दुबक
गणित शिकणं सोपं हाय
गोटयांचे रिंगण चौकोनी पतंग
भूमितीला घाबरायचं कारणच काय
पृथ्वीचं टरबूज अक्षांश रेखांश
उत्तर ध्रुवाला देतच नाय
मोहंजोदडो हडप्पा मधल्या
घंराच्या रचनेची ओळख पहाय
केप ऑफ गुडहोपला वळसा घालून
खलाशी गेला कोण मला सांग
आ आ
वास्को दी कोलंबस
नाय नाय
कोलंबस दी गामा
चिखलूचा झाला मामा
चिखलूचा झाला मामा
चिखलूचा झाला मामा
हे हे चिखलूचा झाला मामा
हे चिखलूचा झाला मामा

डिपाडी डिपांग ढिडपाडी डिपांग
अडाणीपणाच्या नानाची टांग

चिखलू सांग

चिखलू सांग
चिखली मध्ये जन्म झाला कुणाचा
तात्या टोपे
नाय नाय
नाना फडणवीस
की की झाशीच्या राणीचा
येड्या खुळ्या जड बुडाच्या
लोकमान्य टिळकांचा

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक
जन्म १८५६ मुत्यू १९२०
म्या शेंगा खाल्या नाही
म्या टरफलं उचलनार नाही
याच स्वाभाविक स्वरूप
स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे
आण त्यो मी मिळवणारच
विंग्रज सरकारचं डोकं
ठिकाण्यावं हाय का?
असा खडा सवाल
मंडाल्याच्या तुंरूगात
गीतारहस्य ग्रंथाचं लेखक
सार्वजनिक गणेशोत्सवाची
स्थापना करणारे
तेल्या तांबोळयांचे नेते

एडिसनच्या डोक्यामध्ये
पेटला कसा दिवा
वेंडरवॉलच्या गोलामधली
काढली कोणी हवा
जेम्सवॅटची किटली उकळून
शोध कसला लागला सांग
वाफेचे इंजिन

हं शाब्बास
डिपाडी डिपांग ढिडपाडी डिपांग
अडाणीपणाच्या नानाची टांग
अडाणीपणाच्या नानाची टांग

कर्ता कोण कर्म कसले
क्रियापदाचे कारण काय
संस्कृत मधल्या प्रथमा द्वितीया
राम चालवा ओढत पाय
राम रामो रामः प्रथमा
रामो रामम् रामः द्वितीया

ढाँचे के आधारपर लिखना कहानी
केवढं सोपं हाय
ए बी सी डी स्मॉल कॅपिटल
विंग्रजीचा तर वांदाच नाय
विंग्रजी लई महत्वाचं हाय
आता समज
आपल्याला म्हनायचं आसन की
झाड आपल्या पानांनी श्वास घेत्यात
तर असं म्हणायचं
की ते हे रे आपलं
काय ते
प्लान्टस् ब्रिथ थ्रू देअर लिव्हज्
व्हाईल हुमन्स् युज देअर नोझेस्
इज दॅट व्हाय वुई स्लीप ऑन कॉटस्
ॲन्ड प्लान्टस् ऑफ बेडस् ऑफ रोजेस
सरप्राईजड सरप्राईज ॲडस्
पंच टू लाईक माय बॉय

ॲन्ड स्पाईस कम्स् फ्रॉम व्हरायटी
काइन्डस् कम्पॅशन आर एक्सलेंट व्हर्च्यूज

PlanetRead

Literacy for a Billion

बट नॉलेज इज मॅन्स टॉप मोस्ट ब्यूटी
सूर्याची किरणं हिरवी
पानं करती कशी ती श्वासोच्छ्वास
मृगजळ म्हणजे बाष्पामधल्या
प्रकाशकिरणांचा आभास
धावतं हरीण वेग नी करण
अंतर मोजायचं एकक काय
बावीस वरती सातच खालती
तरीही त्याला म्हणत्यात पाय
गारो खाशी जैंतीयाच्या
डोंगरांचीही आडवी रांग

डिपाडी डिपांग ढिडपाडी डिपांग
अडाणीपणाच्या नानाची टांग
अडाणीपणाच्या नानाची टांग

शाळेत येती धमाल नुसती
रोज रोज कळतय नवं नवं
वाचनं लिहीनं विचार करनं
वाटतंय अगदी हवं हवं
याहून जास्त कुठं शिकायचं
त्या शाळेचं नाव मला सांग

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*